**परिपत्रक क्र. १**

**रयत शिक्षण संस्था, सातारा**

दिनांक - २२ / ०३ /२०१७

**प्रती,**

**सर्वश्री शाखाप्रमुख व सेवक वर्ग,**

**यांना ---**

**विषय- रयत सेवक कुटुंब कल्याण योजनेच्या सुधारित स्वरूपासंबंधी**

रयत शिक्षण संस्थेच्या, रयत सेवक कुटुंब कल्याण योजनमध्ये आमूलाग्र बदल करण्यात आलेला आहे. रयत सेवक कुटुंब कल्याण योजनेच्या सभासदांना चांगल्या रीतीने मदत मिळावी यासाठी सुधारित स्वरूपात तयार करण्यात आलेली आहे. या अगोदर सदर योजनेचा आवाका आजच्या दृष्टीने खूपच मर्यादित असल्यामुळे असा बदल अपेक्षित होता. सुधारित रयत सेवक कुटुंब कल्याण योजनेची अंमलबजावणी एप्रिल २०१७ पासून होणार आहे.

रयत शिक्षण संस्था, सातारा

## रयत सेवक कुटुंब कल्याण योजना

१) सुधारित रयत सेवक कुटुंब कल्याण योजनेची प्रत्येक सभासदासाठी वर्गणी रु. ५,०००/- असून सदरची वर्गणी सन २०१७-२०१८ या वर्षात एक अथवा जास्तीत जास्त पाच समान हप्त्यात भरावयाची आहे. ही वर्गणी माहे मेमध्ये होणा-या एप्रिलच्या पगारातून रयत सेवक कुटुंब कल्याण योजनेच्या कार्यालयाकडे पाठविण्यात यावी.

२) रयत सेवकाकडून रयत सेवक कुटुंब कल्याण योजनेची एकूण वर्गणी रु. ५,०००/- योजनेकडे जमा झाल्यानंतर त्या सेवकाने सुधारित योजनेप्रमाणे पुन्हा वर्गणी पाठविण्याची आवश्यकता नाही.

३) रयत सेवक कुटुंब कल्याण योजनेच्या प्रत्येक सभासदाची सध्या जमा झालेली रक्कम सुधारित रयत सेवक कुटुंब कल्याण योजनेच्या वर्गणीमध्ये समाविष्ट केली जाईल. अशा सेवकांनी वर्गणीची उरणारी रक्कम (रु. ५,०००/- साठी कमी पडणारी) २०१७-२०१८ या वर्षात एक रकमी किंवा जास्तीत जास्त समान पाच हप्त्यांमध्ये पूर्ण करावयाची आहे. प्रत्येक शाखेने आपल्या शाखेतील सेवकांचा पूर्वीचा सेवक कुटुंब कल्याण योजनेच्या वर्गणीचा तपशील वार्षिक ऑडिटचेवेळी खातेउतारा स्वरुपात रयत सेवक कुटुंब कल्याण योजना कार्यालयाकडून पूर्ण करुन घ्यावयाचा आहे. याशिवाय जुन्या सभासदांचे वर्गणीचे तपशील संस्थेच्या www.erayat.org वेबसाईटवर उपलब्ध करुन देत आहोत.

४) रयत सेवक कुटुंब कल्याण योजनेच्या नवीन सभासदाने वर्गणी रक्कम एकरकमी किंवा समान पाच हप्त्यांमध्ये या वर्षात पूर्ण करावयाची आहे.

५) रयत सेवक कुटुंब कल्याण योजनेचे सभासद होण्यासाठी प्रत्येक सेवकाचा स्वतंत्र सभासद अर्ज भरुन घेतला जाईल. सदरचा सभासद अर्ज सॉफ्ट व हार्ड कॉपी स्वरुपात मा. चेअरमन, रयत सेवक कुटुंब कल्याण योजना यांचेकडे पाठवावयाचा आहे. अर्जाचा नमुना या परिपत्रकासोबत रयत शिक्षण संस्थेच्या www.erayat.org **ऑनलाईन** वेबसाईटवर उपलब्ध करुन देत आहोत. प्रत्येक सभासदाने ऑनलाईन अर्ज करुन तसेच तोच अर्ज स्वतंत्रपणे भरून शाखेमार्फ़त पोष्टाने ऑफ़िसकडे पाठविणे गरजेचे आहे.

६) रयत सेवक कुटुंब कल्याण योजनेची वर्गणी रयत सेवक कुटुंब कल्याण योजनेच्या कार्यालयाकडे, सातारा येथे पाठवावी. (पत्ता - मा.चेअरमन रयत सेवक कुटुंब कल्याण योजना, रयत शिक्षण संस्था मध्यवर्ती कार्यालय, सातारा ४१५००१) सदर वर्गणी ,बँक सभासद नंबर व सभासदाचे संपूर्ण नाव लिहावे. शाखेतील अशा सभासदांची यादी दोन प्रतीत करुन त्या यादीसह वर उल्लेख केल्याप्रमाणे वर्गणी पाठवावी.

७) सुधारित योजनेचे सभासदत्व स्वीकारतेवेळी सेवकाचे वय जे ५८ व्या अथवा ६० व्या वर्षी सेवानिवृत्त होणार आहेत त्यांच्या बाबतीत अनुक्रमे ४८ वा ५० वर्षापेक्षा अधिक नसावे फक्त योजनेतील जुन्या सभासदासाठी सेवकाचे वय अनुक्रमे ५६ वा ५८ वर्षापेक्षा अधिक नसावे.

८) सुधारित योजनेच्या सभासदत्वासाठी प्रवेश फी रु. १००/- असून वर्गणी किमान हप्ता १,०००/- राहील. ज्या दिवशी सेवकाची सदर रक्कम रु.१,१००/- (१००+१,०००) रयत सेवक योजनेकडे जमा होईल त्या तारखेपासून त्या सेवकास या योजनेचे सभासदत्व प्राप्त होईल. या योजनेचे जे जुने सभासद आहेत त्यानासुद्धा १००रु. प्रवेश फी आहे. सदर सेवकाने योजनेची वर्गणी जास्तीत जास्त पाच समान हप्त्यात पूर्ण करावयाची आहे. सुधारित योजनेची प्रवेश फी रु. १०० व वर्गणीचा पहिला हप्ता कमान रु. १००० व योजनेचा पूर्ण भरलेला अर्ज योजनेकडे प्राप्त होताच सेवकाला कुटुंब कल्याण योजनेचा स्वतंत्र सभासद नंबर देऊन तो (sms अथवा Email ने ) शाखेकडे कळविला जाईल.

९) सभासदाने आपला रयत सेवक बँकेचा सभासद नंबर, बँक शाखेचे नाव व बँकेचा IFSC क्रमांक अर्जात नमूद करावयाचा आहे.

**योजनेचे फायदे -**

१) सुधारित योजनेनुसार निधन पावलेल्या सभासदाच्या वारसास **रु. एक लाख** आकस्मिक सहाय्य निधी देण्याची भरीव तरतूद केलेली आहे. पूर्वी हा निधी रु. तीस हजार देण्यात येत होता.

२) सेवानिवृत्त / संस्था सोडलेल्या सभासदांना त्यांची योजनेकडे जमा झालेली (रु. ५०००/- वर्गणी पूर्ण झालेल्या सभासदांनाच) वर्गणी व खालीलप्रमाणे बोनस रक्कम त्याच्या सुधारित योजनेच्या सेवाकालावधीनुसार देण्यात येईल.

१) पाच वर्षापर्यंत सभासदत्व असणारे सभासद - रु. एक हजार
२) दहा वर्षापर्यंत सभासदत्व असणारे सभासद - रु. दोन हजार
३) दहा वर्षापेक्षा अधिक काळ सभासदत्व असणारे सभासद - रु. पाच हजार

तरी आपण आपल्या शाखेतील सर्व सेवकांना या सुधारित योजनेचे स्वरुप निदर्शनास आणून त्याचे महत्त्व विषद करावे. आपल्या शाखेतील सर्व कायम सेवक सदर योजनेचे सभासद होतील यादृष्टीने नियोजन करावे. हे परिपत्रक आपल्या शाखेतील सर्व सेवकांना निदर्शनास आणून परिपत्रक वाचल्याबद्दल त्यांच्या स्वतंत्र कागदावर सह्या घ्याव्यात. आपल्या शाखेमध्ये रयत सेवक कुटुंब कल्याण योजनेची स्वतंत्र फ़ाईल ठेवावी.

(प्रिं. डॉ. गणेश ठाकूर)
सचिव,
रयत शिक्षण संस्था, सातारा

BH/ KK/Pripatrak No-१/२०१७